
करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

वेताळ पेठ, करमाळा.मो.९४२३३३७४८०

संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे    संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे,



सोनं बरसो आपल्या घरीदारी
आनंदाच्या सुखमयी अखंड सरी
आपल्या स्वप्नपूर्तीचा ठरो हा दसरा
आपला चेहरा सदैव असो हसरा !
दसरा निमित्त सर्वांना मंगलमय हार्दिक शुभेच्छा
जगताप गटाचे नेते व माजी आमदार
मा.श्री.जयवंतराव जगताप यांचे नेतृत्वाखाली करमाळा कृषी उत्पन्न बाजार समिती बिनविरोध झाल्याबद्दल सर्व संचालकांचे
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक के.बी.कन्स्ट्रक्शन
* श्री.किशोर भगत * प्रितम भगत व परिवार करमाळा.

नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.१४८ | पाने-२० | दि.२०/१०/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.

॥ श्री कोटलिंग प्रसन्न ॥
स्थलांतर.. स्थलांतर..
शिवम स्टिल ॲन्ड सिमेंट एजन्सी
मजबुती आणि विश्वास एकाच ठिकाणी..!
टी.एम.टी.बार चे अधिकृत विक्रेते
खडी, क्रॅशसॅण्ड योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : अमोल बबन ढवळे
(9850125561, 9423339966)
पत्ता : नगर-सोलापूर बायपास रोड, निलज चौक, संत निरंकारी मंडळ, शेजारी, करमाळा.
आयकॉन स्टीलचे अधिकृत विक्रेते

# ऊस उत्पादक शेतकरी संतप्त - कारखानदारांनी तात्काळ बिले द्यावीत

## अन्यथा शेतकऱ्यांच्या उद्रेकाला सामोरे जावे लागेल !

करमाळा : तालुक्यातील मकाई व श्री कमलाई साखर कारखान्याने शेतकऱ्यांची ऊसाची बिले गेल्या नऊ महिन्यापासून दिली नसल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. एवढेच नाहीतर पैशाअभावी आत्महत्या करण्याची वेळ बळीराजावर आली आहे. असे असताना कारखानदार मात्र सुस्त आहेत. शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा आता अंत संपला असून, शेतकऱ्यांचा दसरा-दिवाळी सण गोड करा.. अन्यथा उद्रेकाला सामोरे जावे लागेल; अशा संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांमधून व्यक्त केल्या जात आहेत.



मकाई व कमलाई शुगर या कारखान्याकडे तालुक्यातील शेतकऱ्यांचे कोट्यावधी रूपयांची ऊसाची बिले थकीत आहेत. या बिलावर शेतकरी वारंवार आंदोलने व रास्ता रोको करीत आहेत, पण कारखानदारांना काही घाम फुटत नाही. कमलाई कारखान्याने बऱ्यापैकी बिले दिलेली असून अजून काही बिले देणे बाकी आहेत. मकाई कारखान्याकडे ९० टक्के शेतकऱ्यांची बिले अद्याप येणे आहेत. कारखान्याचा गळीत हंगाम १ डिसेंबर पासून सुरू होत आहे. तरी अद्याप मकाई कारखान्याने पहिल्या हप्ता सुध्दा दिलेला नाही. ज्या शेतकऱ्यांचे जीवन निव्वळ शेतीवर अवलंबून आहे त्या शेतकऱ्यांची आज काय अवस्था असेल.. हे सांगण्याची गरज नाही. अनेक शेतकऱ्यांच्या घरातील लग्नं तसेच आजारपणालाही कारखानदारांनी ५० हजार रूपयाची रक्कम मागून देखील दिलेली नाही. एवढेच नाहीतर दवाखान्यासारख्या संवेदनशील कामासाठीही कारखान्याने शेतकऱ्यांची आर्थिक मदत केलेली नाही. (पान २ वर)

संपुर्ण परिवाराची वस्त्रखरेदी आता एकाच ठिकाणी




भव्य शुभारंभ
नव्या सेवेचा...
आम्ही कृष्णाजीनगर येथे ६००० स्के.फुटच्या प्रशस्त जागेत शुक्रवार दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी एक भव्य फॅमिली शोरुम रुपांतरीत करीत आहोत. या शुभप्रसंगी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.
के के लाईफस्टाईल
इतरांपेक्षा वेगळे दिसा
श्री कमलादेवी रोड, करमाळा, जि. सोलापूर 99214 12220
• मेन्स • लेडिज • किडस् • साडी • इथेनिक वेअर • लग्नबस्त्याचे सर्व कपडे

दिखाऊ नव्हेतर कर्तृत्वाने स्मार्ट असणाऱ्यालाच समाजात किंमत असते !

## संपादकीय.........................................!

# स्मार्ट...

'स्मार्ट' हा शब्द अलिकडे खूपच चर्चेत आला आहे. स्मार्ट म्हणजे एखादी व्यक्ती अतिशय सुंदर असणे असे आपण संबोधतो किंवा विविध विषयात पारंगत असणाऱ्या व्यक्तींना आपण स्मार्ट आहोत; असे वाटते. तर कलाप्रांतात, राजकारणात, व्यवसायात भरारी मारणाऱ्या व्यक्तीला आपण स्मार्ट समजतो. खरंतर स्मार्ट याचा मराठीत अर्थ चलाख, हुशार, अद्ययावत, चुणचुणीत, बुध्दीमान, तर्रतरीत असा आहे. थोडक्यात स्मार्ट म्हणजे उच्च दर्जाची मानसिक क्षमता असणे होय.

आजच्या स्पर्धेच्या युगात 'स्मार्टनेस' हा परावलीचा शब्द बनलेला आहे. हा स्मार्टनेस आपणांस आयजीपी विश्वासराव नांगरे-पाटील किंवा क्रिकेट मधील एम.एस.धोनी यांच्याकडे पाहिल्यानंतर समजतो. प्रत्यक्षात स्मार्टवर्क ही आज काळाची गरज बनली आहे. ज्या विद्यार्थ्याला चांगले गुण मिळवायचे आहेत त्याला स्मार्ट अभ्यास करणं गरजेचं बनलं आहे. ज्याला नोकरीत पुढं जायचं आहे त्याला स्मार्ट बनणं आवश्यक आहे. कोणत्याही क्षेत्रात तुम्ही स्मार्ट असल्याशिवाय तुमची प्रगती होऊ शकत नाही. हा स्मार्टनेस केवळ दिखाऊ असून चालत नाही किंवा बाह्यरंगावर दाखवून चालत नाही. हा स्मार्टनेस केवळ उद्योग व्यवसायासाठीच आवश्यक आहे असे नाहीतर प्रत्येक व्यक्तीला स्मार्ट बनण्याची गरज आहे. आणि हो.. स्मार्ट बनण्यासाठी वयाची अट नाही. कोणत्याही वयात तुम्ही स्मार्ट होऊ शकता.

स्मार्ट बनण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला चांगल्या सवयी लावण्याची गरज आहे. विशेष म्हणजे जे लोक स्मार्ट आहेत, त्या स्मार्ट लोकांचे अनुकरण केले पाहिजे. स्मार्टसाठी मनाची तयारी (माईंडसेट) फार महत्वाची असते. आपल्याकडे एक म्हण आहे.. 'अंथरूण पाहून पाय पसरावेत' पण स्मार्ट लोक अंथरूण कमी पडल्यास ते अंथरूण मोठे करतात, हाच त्यांच्या स्मार्टपणाचा गुण आहे. हे लोक मन, तोंड आणि उत्साह थोडक्यात माईंड, माऊथ अॅन्ड मुड या तीनही गोष्टी कंट्रोलमध्ये ठेवतात. कोठेही भावनिक होत नाहीत व जिथे आपली गरज आहे तिथे आपले काम करतच असतात हे महत्वाचे आहे. स्मार्ट लोक कुठलीही गोष्ट येत नाही म्हणून सोडून देत नाहीत तर जी गोष्ट येत नाही ती गोष्ट शिकण्यासाठी ते प्रयत्न करत असतात. शिकण्याकरीता ते वयाचा विचार करत नाहीत. सतत शिकणे हाच खरा स्मार्टनेसपणा आहे. पाणी साचलेतर दुर्गंधी येते आणि पाणी वाहत राहिलेतर ते स्वच्छ राहते. माणसाचे तसेच आहे. माणूस शिकत गेला, वाचत गेला तर तो स्मार्ट बनतो. स्मार्ट माणसाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तो समोरच्याला ऐकून घेतो, त्याला वेगवेगळे प्रश्न विचारतो आणि आपणाला पाहिजे ते मिळवतो.

दुसरी गोष्ट म्हणजे त्याचे कम्युनिकेशन स्कील म्हणजे संवादाची कला त्याच्याकडे खुप चांगली असते. स्मितहास्य करत समोरच्याला आनंद वाटेल असे बोलणे हे स्मार्टपणाचे लक्षण आहे. एवढेच नाहीतर त्याची बॉडीलँग्वेज (शारिरीक हावभाव ) हे महत्वाचे ठरतात. ही व्यक्ती कोणत्या प्रसंगी कोणते कपडे घालावेत; याचे योग्य नियोजन करते. समारंभाला जाताना, अंत्यविधीला जाताना, रूग्णाला भेटायला जाताना कोणते कपडे असावेत; याचे भान असणे आवश्यक आहे. कपडे फार ढिल्ले नसावेत आणि फार ताईटही नसावेत, भडक नसावेत आणि पारदर्शकही नसावेत. असे काही संकेत असतात ते स्मार्ट लोक पाळतात. स्मार्ट लोकांच आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते वेळेला महत्व देतात. टाईम इज मनी असे समजूनच ते टाईम मॅनेजमेंट करतात. कोणत्याही प्रसंगी वेळेपूर्वी किंबहुना वेळेवर हजर राहतात. आपलं काम संपलं की लगेच दुसऱ्या कामाला लागतात. उगाच रेंगाळत नाहीत, उगाच पसरट गप्पा मारत नाहीत किंवा अनाहूतपणे अनावश्यक ठिकाणी जात नाहीत. स्मार्ट लोक हे प्रत्येक घटनेचे सुक्ष्म निरीक्षण करतात आणि त्यातून चांगलं ते आत्मसात करतात.

अलिबाबा चे संस्थापक जॅक मॉ असं म्हणतात.. " जे लोक स्मार्ट असतात त्यांना नेमकं काय पाहिजे हे समजतं आणि त्याचा पाठपुरावा करून ते हासिल करतात. इतर लोकांना नेमकं काय हवय हेच समजत नाही आणि त्यात ते आपला वेळ खर्च करून काहीच आत्मसात करत नाहीत." स्मार्ट होण्यासाठी फिजिकल फिटनेस म्हणजे शारिरीक स्वास्थ्य फार महत्वाचे आहे. काय खावं, किती खावं, काय प्यावं, काय ल्यावं यावर त्यांचं नियंत्रण असतं.

एक म्हण आहे.. 'तण जितना युमता है, उतना स्वस्थ रहता है । मन जितना शांत रहता है, उतना स्वस्थ रहता है ।' म्हणजे शरीर आणि मन दोन्हीही उत्तम दर्जाचं ठेवण्यासाठी प्रयत्न करतात. स्मार्ट लोक हे दररोज कामाचे नियोजन करतात. कामाची लिस्ट बनवतात. त्यात अति तातडीची, तातडीची व सावकाशीनं करावयाची तसेच स्वत: करावयाची व इतरांकडून करावयाची याचेही नियोजन करतात आणि त्यातून मोठा वेळ वाचतो. स्मार्ट लोक आत्मघातकी निर्णय घेत नाहीत. एका दिवसात एक किलो वजन कमी करणार, एका दिवसात दिल्लीला जाऊन येणार वगैरे.. ज्या गोष्टी आपण निश्चित करू शकतो यावर त्यांचे लक्ष केंद्रीत असते. स्मार्ट लोक सोशलमिडीयाचा म्हणजे व्हॉटसअप्, फेसबुक, इन्स्टाग्राम, टीव्ही याचा वापर करतात. परंतु मर्यादित , गरजे इतकाच .! मोबाईल किंवा टिव्ही वर दोन-दोन तास चित्रपट बघणे असे काम ते कधीच करत नाहीत. स्मार्ट लोक बोलताना संदिग्ध बोलत नाहीत. तर ते जे बोलतात ते स्पष्ट बोलतात. गोड बोलतात आणि गरज पडल्यास विनम्रपणे नकारही देतात. स्मार्ट लोक मला हे येते, मला ते समजते, मी ते करू शकतो अशा बढाया कधीच मारत नाहीत. स्मार्ट लोक हे प्रश्नात कधी गुंतून पडत नाहीत तर प्रश्न सोडविण्याच्या पर्यायावर लक्ष केंद्रीत करतात. त्यामुळे संकटं आलीतरी त्यातून ते सहिसलामत बाहेर पडतात.

स्मार्टनेस हा बाहेरच्या रंगरूपावर किंवा पर्सनॅलिटीवर थोडाबहूत अवलंबून असतो, पण सर्वस्वी नाही. स्मार्टनेस बाह्यरंगापेक्षा अंतरीक विचारावर, बुध्दीमत्तेवर अवलंबून असते. स्मार्ट लोक आपली महत्वाची गुपिते कितीही जवळची व्यक्ती असेलतरी सांगत नाहीत. कारण आजची आपली व्यक्ती ही उद्या आपली राहिलच हे सांगता येत नाही. स्मार्ट लोक जे काम आहे ते नाकारत नाहीत, पण सर्वसामान्य लोक ते काम ज्याप्रकारे करतात त्यापेक्षा हे लोक ते काम स्मार्ट करतात म्हणूनच ते स्मार्ट ठरतात. जीवनामध्ये आहे त्यापेक्षा चांगलं बनणं हे कधीपण गरजेचंच आहे. त्यामुळे दररोजच्या सवयी बदलून चांगल्या सवयी निर्माण करणं म्हणजे स्मार्ट बनणं. मला वाटतं ते आपणाला सहज जमणार आहे. त्यामुळे स्मार्ट बनण्याला सुरुवात करूया !

पान १ वरून पुढे...

## ऊस उत्पादक शेतकरी संतप्त

त्यामुळे अनेकांना व्याजाने पैसे काढून दवाखान्याचा खर्च भागावा लागला आहे. शेतकऱ्यांच्या मुलाचा शिक्षणाचा खर्च, खताचा खर्च, मशागतीचा खर्च यामुळे शेतकऱ्यावर कर्जाचा डोंगर वाढला आहे. ऊसाचे पैसे मिळाल्याशिवाय त्यांचेपुढे आता कोणताही पर्याय राहिलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची सहन करण्याची क्षमता आता संपली असून आठ दिवस, महिना करीत करीत नऊ महिने झालेतरी शेतकरी अजून ऊसाचे बिल मिळेल म्हणून आशा बाळगून बसला आहे. परंतु कारखानदारांनी दिलेला शब्द अजुन कधी सत्यात उतरेल हे सांगता येत नाही. कारखानदारांनी शेतकऱ्यांचा विश्वास गमावला असून, त्यांनी आता शेतकऱ्यांची जास्त परीक्षा न घेता तात्काळ बिले काढावीत अन्यथा उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही; असाही इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

## नवरात्रोत्सवाचे सार..

नवरात्रोत्सवाचे सार...
घरात चालती-बोलती लक्ष्मी
पाणी भरते आहे...
अन्नपूर्णा होऊन भोजन...
बनवत आहे
गृहलक्ष्मी होऊन कुटूंबाला...
सांभाळते आहे
सावित्री होऊन मुलांचा...
अभ्यास घेत आहे
दुर्गा होऊन संकटांशी...
सामना करत आहे
कालिका, चंडिका होऊन...
घराचे रक्षण करत आहे
तिची पूजा नको पण...
स्त्री म्हणून सन्मान व्हावा
देवी फक्त देव्हाऱ्यात नाही
तर मनातही बसवा
मातीच्या मूर्तीसोबत...
घरातील जिवंत स्त्रीलाही
आदर, सन्मान द्या
तिच्या संकटकाळी..
मदतीला धावून जा
हेच नवरात्रोत्वाचे
खरे सार आहे..!

...सौ.सुनंदा सुरेश जाधव
(मुख्याध्यापिका, न.पा.शाळा)

**बंगला विकणे आहे**

मथुरानगर मधील
११०० स्क्वे.फुट बांधकाम
असलेला बंगला व
४७५ स्क्वे.फुट बांधकामाचे
रो-हाऊस त्वरीत विकणे आहे
• संपर्क •
मो.9689557710

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)


परंपरेचा आदर आणि आधुनिकतेचं स्वागत !
Since - 1985
YASH
हमखास बक्षिसासह
दिवाळी-पुर्व खरेदी
निवांत खरेदी करा आणि
प्रत्येक खरेदीवर मिळवा हमखास बक्षिसे...
यश
कलेक्शन
मेन रोड, करमाळा, जि.सोलापूर
• शुटींग • शर्टिंग • डिझायनर साड्या • ड्रेस मटेरियल • रेडिमेड •


AJK
मे. आनंदी ज्वेलर्स
दसरा-दिवाळी
बंपर गीफ्ट
धमाका
20,000 च्या पुढील
सोने दागिने (22 कॅरेट)
खरेदीवर
दि. १५/१०/२०२३ ते १५/११/२०२३
*नियम व अटी लागू
भिशी योजना उपलब्ध (12 महिने +1 महिना)
मेन रोड, करमाळा 9420915099, 9970020035

### चंद्रकांत सरडे यांच्या वाढदिवसानिमित्त
# भव्य रक्तदान शिबीर व अभिष्टचिंतन सोहळा संपन्न



करमाळा(सं.प्र.) : चिखलठाणचे लोकनियुक्त सरपंच व कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक चंद्रकांत सरडे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीराचे उद्घाटन यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, सावंत गटाचे नेते सुनिल सावंत, श्रीमती रा.बा.सुराणा प्रशालेचे मुख्याध्यापक वायदंडे, जि.प.शाळेचे मुख्याध्यापक बोराडे गुरूजी, ग्रामसेवक घाडगे यांचे प्रमुख उपस्थित झाले. यावेळी सरपंच चंद्रकांत सरडे, आजिनाथ सरडे, अर्जुनभाऊ शंकर, आत्माराम नेमाणे, पै.काळुराजे नेमाणे, हनुमंत सरडे, देशमुख सर, दादासाहेब सरडे, पै.गोटम पवार, सुनील कुचेकर, सुधीर पोळ, राजेंद्र कांबळे, सचिन सरडे व ग्रामस्थ उपस्थित होते. या शिबीरात १०३ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवून रक्तदान केले. प्रत्येक रक्तदात्यास व ग्रामस्थांना घड्याळ वाटप करण्यात आले. या शिबीर प्रसंगी चंद्रकांत सरडे युवा मंच, अष्टविनायक गणेश तरूण मंडळ, सुनिल कुचेकर मित्र परिवार, राजमाता मित्र मंडळ, श्री दत्त मित्र मंडळ, जाणता राजा ग्रुप, शिवशंभो मित्र मंडळ, भिमज्योत मित्र मंडळ, जय हनुमान मित्र मंडळ, जय बजरंग एकता ग्रुप, शिवप्रतिष्ठाण ग्रुप, श्री कोटलिंग गणेश तरूण मंडळ, टोपेबाबा मित्र मंडळ, शिवछत्रपती तरूण मंडळ चिखलठाण नं.२, जय भवानी शिवरत्न तरूण मंडळ चिखलठाण नं.२, ओनली काका ग्रुप, श्री कोटलिंग ऊस वाहतूक संघटना, विघ्नहर्ता मित्र मंडळ, जगदंब ग्रुप चे सर्व सदस्य उपस्थित होते.



चिखलठाण नं.१ येथे सायंकाळी चंद्रकांत सरडे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा व नागरी सत्काराचे आयोज करण्यात आले होते. या कार्यक्रमात आमदार संजयमामा शिंदे यांचे हस्ते श्री.सरडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी टायगर ग्रुपचे अध्यक्ष तानाजी जाधव, बाजार समितीचे संचालक महादेव कामटे, वाशिंबेचे सरपंच तानाजी झोळ, गौतम पवार, भिमराव गव्हाण, शामराव गव्हाणे, धनाजी सरडे, बापू सरडे, अभिमान सरडे, सुधीर पोळ व ग्रामस्थ उपस्थित होते.

# आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत पल्लवी सुपनवर हिचे यश

करमाळा(सं.प्र.) : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत करमाळा तालुक्याची सुवर्णकन्या महिला पैलवान पल्लवी सुपनवर हिने ५३ किलो वजन गटामध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल तिचा ट्रॉफी, सुवर्णपदक व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. माजी आमदार नारायण पाटील यांनी पल्लवी सुपनवर हिचे विशेष अभिनंदन केले.



प्रवेश ! प्रवेश !!
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे संचलित सरकारमान्य
अशोक कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट
इंग्रजी : (३०-४०) मराठी : (३०-४०) हिंदी : (३०-४०)
टायपिंग क्लाससाठी प्रवेश देणे सुरू आहे
किल्ला विभाग, करमाळा. मो.८०८७९०५०८५

डॉ.राऊत Advanced dental Clinic & Root Canal Center
दातांचा दवाखाना
उपलब्ध सुविधा...
- इंट्राओरल कॅमेराद्वारे तपासणी
- डिजीटल एक्स-रे
- अत्याधुनिक यंत्रणेद्वारे रूट कॅनल ट्रिटमेंट
- वेदनारहित दात व दाढ काढणे
- पडलेले दात बसविणे
- दात साफ करणे
- दाताच्या रंगाचे सिमेंट भरणे/चांदी भरणे





डॉ.कौस्तुभ काशिनाथ राऊत
बी.डी.एस. (डेन्टल सर्जन)

उपलब्ध सुविधा...
- स्क्रुच्या सहाय्याने दात बसविणे (डेंटल इम्प्लांट)
- अक्कलदाढ काढणे
- वेडेवाकडे पुढे आलेले दात सरळ करणे
- अंशत: किंवा पूर्ण कवळी बसवणे
- हिरड्यांच्या रोगासाठी ट्रिटमेंट
- कॉस्मेटिक ट्रिटमेंट
- कर्करोगाचे निदान
- गरजेनुसार तज्ञ डॉक्टरांच्या भेटी

महात्मा गांधी शाळेच्या पाठीमागे, पुणे रोड, करमाळा. (मो.9552134186)

### नामसाधना प्राथ.विद्यामंदिर न.पा.सेंट्रल स्कुल मुले नं.१ शाळेस
# दोन संस्थांचे 'आदर्श शाळा' पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.): शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या कालावधीमध्ये केलेल्या उत्कृष्ट कामकाजाची नोंद घेऊन राष्ट्रमाता जिजाऊ प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था व कै.दिगंबररावजी बागल(मामा) प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था या दोन्ही पतसंस्थेच्या वतीने नगरपालिकेच्या नामसाधना प्राथमिक विद्यामंदिर सेंट्रल स्कुल मुले नं.१ या शाळेस आदर्श शाळा पुरस्काराने गौरविले आहे.

मुख्याधिकारी बालाजी लोंढे, प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, केंद्र समन्वयक दयानंद चौधरी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रविण जाधव व सर्व सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे कामकाज प्रगतीपथावर आहे. शंभर टक्के पटनोंदणी, शंभर टक्के उपस्थिती, अनुभवी व तज्ञ शिक्षक, बोलक्या भिंती, वृक्षारोपण, डिजिटल व स्मार्ट शाळा, आनंदी बाजार, स्वतंत्र स्नेहसंमेलन, शैक्षणिक सहल, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, शिष्यवृत्ती, विज्ञान प्रदर्शन तसेच नवोदय, सैनिक स्कुल परीक्षा मार्गदर्शन, लोकसहभाग, स्वच्छ व सुंदर शाळा, पंतप्रधान प्रायमिनिस्टर प्री योजनेत शाळेची निवड, आय.एस.ओ. मानांकन शाळा, अनेकवेळा नगरपालिकेचा स्वच्छ व सुंदर शाळा पुरस्कार प्राप्त. अशा सर्वगुणसंपन्न विद्यार्थी तयार करणारी उपक्रमशील शाळा व तालुक्यातच नव्हे तर सोलापूर जिल्ह्यात फक्त मुलांची सर्वाधिक पटसंख्या असलेली शाळा म्हणून ओळख असलेल्या नामसाधना प्राथमिक विद्यामंदिर न.पा.सेंट्रल स्कुल मुले नं.१ या शाळेस आदर्श शाळा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. शाळेस पुरस्कार मिळाल्याबद्दल अधिकारी, आजी-माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक यांनी मुख्याध्यापिका सुनंदा जाधव (माने) व सर्व शिक्षकांचे विशेष अभिनंदन केले.

नवरात्र व दसऱ्याच्या शुभेच्छा !
नवरात्र म्हणजे शक्तीची उपासना व दसरा म्हणजे विजयाचा उत्सव !
नवरात्रामध्ये पुढील शक्तीवर्धक उत्पादनांवर 5% सुट
- शतावरीकल्प : शरीरातील रसधातू, अम्लपित्त, पाळीच्या समस्यांसाठी
- अस्थीपोषक वटी : शरीरातील अस्थीधातूच्या पोषणांस व कंबर, सांधेदुखीसाठी
- लोहासव : रक्तवाढीसाठी • द्राक्षासव : भूक वाढण्यासाठी
- अश्वगंधारिष्ट : ताकद, उत्साह वाढवण्यासाठी
- पंचकोलासव/पंचारिष्ट : पचनशक्ती वाढवण्यासाठी

वेळ : सकाळी ९.३० ते २ व सायंकाळी ३ ते ७
कालावधी : घटस्थापना दि.१५/१०/२०२३ ते दसरा दि.२४/१०/२०२३ या कालावधीकरीता लागू
रविवार बंद
स्थळ : अभंग आयुर्वेद श्री छत्रपती शिवाजीनगर (सागर थिएटर मागे), करमाळा.


WASHIMBEKAR
Saraf & Son's
दसरा व विजयादशमी
हार्दिक शुभेच्छा
वाशिंबेकर
सराफ अॅन्ड सन्स
सुनिल तुकाराम वाशिंबेकर ९४२१०६२८६२
शेखर सुनिल वाशिंबेकर ८४५९००३४२८
सुभाष चौक, डॉ. पुंडे हॉस्पीटल शेजारी, राशिन पेठ,
करमाळा, जि.सोलापूर - ४१३२०३


खुशखबर
खुशखबर
श्रीराम ट्रॅक्टर्स
करमाळा
दसरा व दिपावलीच्या सर्व शेतकरी बांधवांना हार्दिक शुभेच्छा...!
#AKSHAY PHOTO 9730036066
BOSS 50 (HP)
7250 46 (HP)
ORCHARD 30 (HP)
6028 28 (HP)
ऑफर :- कुठलाही नवीन ट्रॅक्टर घेऊन जावा*डाऊनपेमेंट फक्त २१०००/-हजार रुपये सोबत सर्व बँक लोन उपलब्ध. कमीत कमी व्याजदर व शेवटचा हप्ता माफ त्याच बरोबर मेडिकल इंन्सुरन्स मिळवा.* हमखास एक भेटवस्तू मोफत मोफत मोफत आजच बुक करा
Mo.7350985555
Mo.9011148169
Mo.8600616407
Mo.9890983530

### ग्रामपंचायत निवडणुकीसाठी

# १६ ग्रा.प.च्या सदस्य पदासाठी ३९३ तर सरपंच पदासाठी ७५ अर्ज दाखल

करमाळा (सं.प्र.) : करमाळा तालुक्यातील १६ ग्रामपंचायतीची निवडणूक जाहीर झाली असून १६ ऑक्टोबर पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरूवात झाली आहे १९ ऑक्टोबर पर्यंत ग्रा.पं. सदस्यासाठी ३९३ तर सरपंच पदासाठी ७५ अर्ज दाखल झाले आहेत.

करमाळा तालुक्यातील भगतवाडी, राजुरी, जेऊर, चिखलठाण, गौंडरे, उंदरगाव, कंदर, कोर्टी, वीट, निंभोरे, केत्तूर, रामवाडी, घोटी, रावगाव, कावळवाडी व केम या गावची निवडणूक होत आहे. तसेच तरटगाव, रिटेवाडी व मांजरगाव या ठिकाणी पोटनिवडणूक होत आहे. १६ ग्रा.पं.मधून थेट जनतेतून सरपंच पदाची निवडणूक होत आहे. तर पारंपारिक पध्दतीने पोटनिवडणूक होत आहे. तसेच १६ ग्रा.पं. निवडणुका संगणक प्रणालीद्वारे होत आहे. २० ऑक्टोबरला अर्ज भरण्याची शेवटची मुदत असून २३ ऑक्टोबरला अर्जाची छाननी होणार आहे. २५ ऑक्टोबरला अर्ज मागे घेण्याची मुदत असून त्याच दिवशी अंतिम यादी प्रसिध्द केली जाणार आहे. त्यानंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे. ५ नोव्हेंबरला ग्रा.पं. निवडणुकीसाठी मतदान होणार असून ६ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

# झरे येथे बालविवाह मुक्त भारत अभियान कार्यक्रम संपन्न

करमाळा(सं.प्र.): कैलास सत्यार्थ चिल्ड्रन फाऊंडेशन दिल्ली, महात्मा फुले समाजसेवा मंडळ करमाळा, अभिनव भारत समाजसेवा मंडळ सालसे तसेच नामदेवराव जगताप माध्यमिक विद्यालय झरे यांच्या संयुक्त विद्यमाने झरे येथे बालविवाह मुक्त भारत अभियान हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक रामहरी घाडगे, चैतन्य चौधरी यांनी बालविवाह मुक्त विषयी मार्गदर्शन केले. बालविवाह ही मोठी गंभीर समस्या आहे. बालविवाह मुक्त अभियान यशस्वी करताना पालक/ग्रामस्थ वर्गाने लक्ष देणे गरजेचे आहे. देशातील बालविवाह प्रथ नष्ट करणे हा मुख्य हेतून असून यामुळे होणारे भविष्यातील नुकसान टाळण्यासाठी या



अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणे अत्यंत महत्वाचे असल्याचे स्पष्ट केले. या कार्यक्रमात प्रशालेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी, कर्मचारी बालविवाह मुक्त भारत अभियानात सहभागी होण्यासाठी शपथ घेऊन तसेच अभियानाला गती देण्यासाठी या अभियानाचे शपथपत्र भरून दिली.

# दत्तकला आयडियल स्कुल मधील विद्यार्थीनीची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड

करमाळा(सं.प्र.): सोलापूर येथे नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत केत्तूर नं.१ येथील दत्तकला आयडियल स्कुल ॲन्ड ज्यु.कॉलेजची विद्यार्थीनी आर्या आप्पासाहेब बाबर हिने १७ वर्षे वयोगट २०० मीटर रनिंगमध्ये जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकवला आहे. तिची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १०० मीटर रनिंगमध्ये ही तिने जिल्ह्यात चौथा क्रमांक मिळविला आहे. १७ वर्षे वयोगट २०० मीटर रनिंग मध्ये गोविंद गोरख पाखरे याने तृतीय तर १९ वर्षे वयोगट २०० मीटर रनिंगमध्ये प्रगती प्रविण पाटील हिने प्राथमिक फेरी पार करून अंतिम फेरीत



मजल मारली आहे. दिक्षा कोडलिंगे हिने प्राथमिक फेरीत चौथा क्रमांक मिळविला आहे.

या सर्व यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.रामदास झोळ, उपाध्यक्ष राणादादा सुर्यवंशी, सचिवा माया झोळ यांनी केले .

**साक्षी डेंटल केअर सेंटर** — दातांचा दवाखाना
Sakshi Dental
**डॉ.उषा कुसकर** B.D.S.(Reg No.A-12475)
दाताची मोफत तपासणी
**१३ वर्षापासून दंत चिकित्सक सेवेत...**
- दंत उपचार सल्ला व मार्गदर्शन
- रूट कॅनॉल ट्रिटमेंट
- वेडे-वाकडे दात सरळ करणे
- अंशत: व संपूर्ण कवळी बसवणे
- मेटल, सिरॅमिक, झरकोनिया कॅप ब्रिज बसवणे/क्लिप बसवणे
- फिक्स दात बसवणे, दात काढणे
- ब्लिचींग, इंम्पलाट, एक्स-रे काढणे
- कॉस्मेटिक दंतचिकित्सा
- बाल दंत उपचार
- हिरड्यांच्या आजारावरील उपचार व शस्त्रक्रिया
- दातांच्या रंगाचे सिमेंट, चांदी, जी.आय.सी., कम्पोझिट भरणे
- मशीनद्वारे दात साफ करणे व दात पांढरे करणे.
- अक्कल दात काढणे, काढ-घालण्याचे दात व फिक्स दात बसवणे.
- दातांमधील फटी कमी करणे
- स्माईल डिझायनिंग

वेळ : सोमवार ते शुक्रवार सकाळी ९ ते रात्री ८, शनिवारी सकाळी ९ ते दुपारी २ पर्यंत, रविवार बंद
संपर्क मो.9325544337
एस.टी.स्टॅन्ड समोर, बँक ऑफ इंडिया शेजारी, विक्की प्लाझा, पहिला मजला, करमाळा.

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
**डॉ.विकास देविदास नागरगोजे** (एम.एस.मुंबई)
आता आपल्या **करमाळ्यात !**

**विशेष सुचना...**
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

ऑपरेशन ठिकाण
**लोकरे हॉस्पिटल**
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

**उपलब्ध सुविधा...**
- मुळव्याधवर इंजेक्शन
- डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे
- संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे
- संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे
- भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

करमाळा
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
स्थळ : सावंत हॉस्पीटल मेनरोड, सावंत गल्ली, करमाळा.
संपर्क : मो.7057675589 7350632138

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई



बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# बाजार समितीच्या सभापतीची निवडणुक २४ ऑक्टोबरला

## सभापती पदी जयवंतराव जगताप यांची निवड निश्चित

करमाळा(सं.प्र.) : करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती व उपसभापती पदाची निवडणूक २४ ऑक्टोबर रोजी दुपारी दोन वाजता होणार आहे. या समितीच्या सभापती पदी माजी आमदार जयवंतराव जगताप यांची निवड निश्चित मानली जात आहे. बाजार समितीची निवडणूक मोहिते-पाटील यांचे पुढाकाराने बिनविरोध झाली असून बाजार समितीवर पुन्हा एकदा जगताप गटाची सत्ता येणार असून माजी आमदार जयवंतराव जगताप हे सभापती होणार असल्याचे मानले जात आहे. उपसभापती पदाचीही निवडणूक याचवेळी होणार असून या पदासाठी गटसचिव बबन मेहेर यांच्या पत्नी शैलेजा मेहेर यांना संधी मिळण्याची दाट शक्यता आहे. ही निवडणूक बाजार समितीच्या सभागृहात २४ ऑक्टोबर रोजी दुपारी दोन वाजता निवडणुक निर्णय अधिकारी ए.ए.गावडे यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. या निवडणुकीसाठी दुपारी २.१० ते २.२५ अर्ज वाटप व स्वीकृत करणे, २.३० वा. अर्जाची छाननी, २.३५ वा. वैध अर्जाची यादी प्रसिध्द करणे, २.४५ वा. अर्ज माघारी घेणे असा कार्यक्रम आहे. ३.०० वा. निवड होणार आहे.

# आदिनाथ कारखान्याच्या पाणीपुरवठा योजनेचे भुमीपूजन

करमाळा(सं.प्र.) : आदिनाथ सहकारी साखर कारखान्यासाठी उजनी धरणातून आठ इंची दोन पाईपलाईन टाकण्याच्या कामाचे भुमीपूजन भैरवनाथ शुगरचे संचालक पृथ्वीराज सावंत यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी प्रशासकीय मंडळ अध्यक्ष बाळासाहेब बेंद्रे, संचालक महेश चिवटे, संजय गुटाळ व कर्मचारी उपस्थित होते. आदिनाथ कारखान्याची पहिली जुनी सिमेंटची पाईपलाईन पूर्णपणे फुटलेली आहे. येणाऱ्या काळात आदिनाथ कारखाना डिसलरी प्रकल्प, इथेनॉल प्रकल्प सुरू करणार आहे. यासाठी आवश्यक असणाऱ्या आठ इंची दोन पाईपलाईन २१ दिवसात पूर्ण करण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला असून ही योजना पूर्ण करण्यासाठी तब्बल ८० लाख रूपये खर्च येणार आहे.

**बारामती मध्ये प्लॉट घ्यायचाय..?**
बारामती येथे 1BHK, 2BHK, 3BHK प्लॉटस् तसेच ओपन प्लॉट शॉप घेण्यासाठी
दसरानिमित्त बुकींग सुरू...
संपर्क: मो.7083253101, 9423333975

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना **श्रीजय नेत्र रूग्णालय**
**डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे** (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A
करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध
**श्रीजय ऑप्टिकल** (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

# आदिनाथ चार लाख टन ऊस गाळप करणार : बाळासाहेब बेंद्रे



करमाळा(सं.प्र.) : तालुक्यातील नव्या उमेदीने पुन्हा चालू झालेल्या आदिनाथ सहकारी साखर कारखान्याची ऊस गाळपाची तयारी पूर्ण झाली असून, यावर्षी कारखाना चार लाख मे.टन गाळपाचे उद्दीष्ट पूर्ण करेल; असे प्रतिपाद कारखान्याचे प्रशासकीय अध्यक्ष बाळासाहेब बेंद्रे यांनी केले आहे.

आदिनाथ कारखान्याच्या बॉयलर अग्नीप्रदीपन सोहळ्याप्रसंगी श्री.बेंद्रे बोलत होते. यावेळी भैरवनाथ शुगरचे कार्यकारी संचालक पृथ्वीराज सावंत यांचे हस्ते बॉयलर प्रदीपन करण्यात आले. यावेळी प्रशासकीय संचालक महेश चिवटे यांचे हस्ते सपत्नीक होमहवन आणि सत्यनारायण पुजा करण्यात आली. यावेळी कारखान्याच्या हितचिंतकांनी आपल्या मनोगतात कारखान्याला सर्व सभासद शेतकऱ्यांनी ऊस देऊन सहकार्य करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमास प्रशासकीय संचालक संजय गुटाळ, कार्यकारी संचालक अरूण वागनवर, माजी व्हा.चेअरमन रमेश कांबळे, बाजार समितीचे माजी सभापती शिवाजी बंडगर, दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ, शेतकरी संघटनेचे राजाभाऊ सरडे, डॉ.हरिदास केवारे, ह.भ.प.केकान महाराज यांच्यासह बहुसंख्य शेतकरी सभासद, कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचालन विजय खटके यांनी केले.

# अंधश्रध्दा निर्मुलन समिती तर्फे अजित कणसे यांचा सत्कार



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या निवडणुकीत स्वाभिमानी शिक्षक पॅनल मधील अजित कणसे हे भरघोस मतांनी निवडून आल्याबद्दल अंधश्रध्दा निर्मुलन समिती शाखा करमाळा यांचे वतीने अजित कणसे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार विवेक येवले हे होते.

यावेळी प्रा.नागेश माने यांनी अंधश्रध्दा निर्मुलन समितीच्या मोहोळ येथे झालेल्या जिल्हा बैठकीतील इतिवृत्तांत वाचून दाखविला. यामध्ये त्यांनी समितीचे सभासद करण्यासाठी प्रयत्न करणे, अंधश्रध्दा निर्मुलन वार्तापत्र नोंदणी करणे, फटाकेमुक्त दिवाळी साजरी करणे आदी विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी अंनिसचे दिगंबर साळुंके, ज्येष्ठ कवी प्रकाश लावंड, खलील शेख, संतोष माने, बाळासाहेब दुधे, सुरेश कोळी, राजेंद्र साने, सुनिल गायकवाड, डॉ.शिवाजी दळवी, डॉ.आप्पासाहेब लांडगे, केतन कांबळे, वैशाली महाजन, मेघना कांबळे, सावित्रा देवकर आदीजण उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे कार्याध्यक्ष अनिल माने यांनी केले. तर उपस्थितांचे आभार रामचंद्र बोधे यांनी मानले.







## मेरी मिट्टी मेरा देश... या मोहिमेद्वारे

# चव्हाण महाविद्यालयात माती संकलनासाठी अमृतकलश तयार



करमाळा(सं.प्र.) : येथील विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, उपप्राचार्य कॅप्टन संभाजी किर्दाक यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राष्ट्रीय सेवा योजना स्तर दोन च्या वतीने आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत मेरी मिट्टी मेरा देश या मोहिमेद्वारे माती संकलनासाठी अमृत कलश तयार करण्यात आला. स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना नमन करण्यासाठी, सीमेवर लढणाऱ्या वीरांचा व निवृत्त वीरांचा सन्मान करण्यासाठी आणि मातृभुमीबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी मेरी मिट्टी मेरा देश हे अभियान संपूर्ण राज्यात मोठ्या उत्साहात साजरे होत आहे. या निमित्त महाविद्यालयात मेरी मिट्टी मेरा देश या अभियान अंतर्गत माती संकलनासाठी अतिशय सुंदर असा अमृत कलश तयार करण्यात आला. महाविद्यालयचे बहुसंख्य विद्यार्थ्यांनी आपल्या गावची मुठभर माती आणून या अमृत कलशामध्ये संकलीत केली. अमृत कलशाचे पूजन प्राचार्य पाटील, उपप्राचार्य किर्दाक यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा.हनुमंत भोंग, प्रा.जयंत भांगे, प्रा.दिलीप जाधव, प्रा.सुवर्णा कांबळे, प्रा.पल्लवी टोणपे, प्रा.अडसुळ, प्रा.रूपाली साळुंखे, ॲड.योगेश शिंपी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि विद्यार्थी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.लक्ष्मण राख, प्रा.सुजाता भोरे यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हा दूध संघाच्या तज्ञ संचालक पदी राजेंद्रसिंह राजेभोसले यांची निवड



करमाळा(सं.प्र.) : सोलापूर जिल्हा दूध संघाचे ज्येष्ठ माजी संचालक व धवलक्रांतीचे प्रणेते तसेच वीट येथील रहिवाशी राजेंद्रसिंह राजेभोसले यांची सोलापूर जिल्हा दूध संघाच्या तज्ञ संचालक पदी निवड करण्यात आली आहे. श्री.राजेभोसले हे जिल्हा दूध संघाच्या संचालक पदी अनेक वर्षे कार्यरत होते. त्यांनी आपल्या कालावधीत दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडविणे, दुधाला जादा दर मिळवून देणे, जिल्हा दूध संघाचे जास्तीत जास्त दूध संकलन कसे वाढेल याबाबत ते सतत प्रयत्नशील राहिले. त्यांना दूध संघाच्या कामकाजाचा दीर्घ अनुभव असल्याने त्यांची संघाच्या वतीने तज्ञ संचालक म्हणून निवड करण्यात आली आहे.




सोऽहम
अनिल तुकाराम वाशिंबेकर
अलंकार ज्वेलर्स, करमाळा
खास दसरा - दिवाळीनिमित्त
दसरा-दिवाळी धमाका
प्रत्येक २२ कॅरेट सोन्याच्या दागिने खरेदीवर एक कुपन
स्क्रॅच करा व लगेच आपले बक्षिस घेवून जा
दि. 24 /10/2023 ते 15/11/2023
प्रथम बक्षिस TVS Scooty
व्दितीय बक्षिस LED TV
तिसरे बक्षिस Sewing Machine
या व्यतिरिक्त प्रत्येक कूपन वर एक बक्षिस
* नियम व अटी लागू
पत्ता:- मेन रोड, करमाळा मो.9284671878


प्रोप्रा.राजेंद्र पवार
Mo. 8080942351
प्रोप्रा.संतोष पवार
Mo. 9325800416
महालक्ष्मी
जागो ग्राहक जागो...
डायरेक्ट मिल ते ग्राहक
कलेक्शन (पोटेगावकर)
सुटींग, शर्टिंग,साड्या, मॅचिंग ब्लाऊज पीस, व सर्व प्रकारचे
फॅन्सी रेडिमेड कपडे व लग्नाचा बस्ता होलसेल दरात मिळेल.
शाखा नं. १-पवार वस्ती, पोटेगाव, संगोबा-तरटगाव रोडवर, ता - करमाळा
शाखा नं. २- महामुनी कॉम्प्लेक्स (महामुनी ज्वेलर्स शेजारी) दत्तपेठ, करमाळा

# ग्रामविकास मधून रस्त्यांसाठी एक कोटीचा निधी मंजूर

करमाळा(सं.प्र.) : तालुक्यातील प्रलंबित नऊ कामासाठी एक कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला असून त्याचा शासकीय आदेश सार्वजनिक बांधकाम विभाग करमाळा यांना प्राप्त झाला आहे; अशी माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी दिली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिवसेनेचे जिल्हा सचिव संजय मोरे, जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.शिवाजी सावंत यांचेकडे रस्त्यांच्या कामासाठी मागणी केली होती. त्यानुसार गुळसडी येथील बिभिषण कळसे वस्ती ते गुळसडी रस्ता खडीकरण, भिलारवाडी येथील बाळू गावडे ते महादेव शिव रस्ता, देवळाली येथे विठ्ठल गोसावी घर ते आरोग्य उपकेंद्र रस्ता, पोटेगाव येथे सुंदरदास केसकर वस्ती ते मसोबा मंदिर रस्ता सभा मंडप, हिवरवाडी कॅनॉल रोड ते चिमाजी मेरगळ वस्ती रस्ता, अंजनडोह येथे श्रीपती शेळके ते ग्रा.पं. रस्ता, मोरवड शिवरस्ता, पोथरे ते सोपान शिंदे घर रस्ता अशा विविध कामांसाठी एक कोटी रूपयांचा निधी मिळाला आहे. करमाळा शहरातील नगरपालिकेची नवीन इमारत व सांस्कृतिक भवन यासाठी नऊ कोटी रुपये मंजूर झाले आहे असून याचे टेंडरचे काम शेवटच्या टप्प्यात आहे. या कार्यक्रमाच्या भुमीपूजनासाठी स्वत: मुख्यमंत्री करमाळ्यात येणार आहेत; अशी माहिती शिवसेना जिल्हा प्रमुख महेश चिवटे यांनी दिली आहे.

# भाजपा कार्यालय समोर खा.नाईकनिंबाळकर यांचे हस्ते डाळ वाटप

करमाळा(सं.प्र.) : केंद्र सरकारच्या नाफेड मार्फत भारत डाळ अंतर्गत करमाळा येथे खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचे हस्ते व भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य राजकुमार पाटील व जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार यांच्या उपस्थित हरभरा डाळचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन भाजपाचे जिल्हा सरचिटणीस तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य गणेश चिवटे यांनी केले होते. यावेळी प्रथमत: भाजपा कार्यालयात लोकांना प्रति आधारकार्ड पाच किलो हरभरा डाळ ६० रु. दराने देण्यात आली. यामुळे प्रतिकिलोमागे लोकांचे ४० रु. वाचले आहेत. डाळ वाटप कार्यक्रमानंतर खासदार नाईकनिंबाळकर यांनी जुना डाक बंगला येथील विश्रामगृहावर सर्वसामान्य लोक, विविध गावचे पदाधिकारी, सरपंच, ग्रा.पं. सदस्य, सोसायटी चेअरमन व सदस्य, डॉक्टर, वकील, प्रतिष्ठीत व्यक्ती, भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते यांची तब्बल चार तास वेळ देऊन अनेक कामे जागच्या जागी मार्गी लावली. यावेळी माढा विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य लोकांनी रस्ते, शेतीसाठी पाणी,



रेल्वे, वीज, सभामंडप आदी कामाची मागणी खासदार यांना केली. याचबरोबर पांडे, झरे, देवळाली येथील शेतकऱ्यांनी दहिगाव उपसासिंचन योजनेचा लाभ देण्याची विनंती केली. किरण बागल, हरिभाऊ झिंजाडे, विठ्ठल शिंदे, संदीप काळे, विष्णू रंदवे, राहूल बागल आदींनी मांगी तलाव कुकडीत वर्ग करण्याचे काम लवकर मार्गी लावण्याची मागणी केली. यावर खासदार यांनी सर्व प्रश्न मार्गी लावण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना फोन लावून योग्य त्या सूचना दिल्या. याशिवाय जातेगाव-टेंभूर्णी रस्त्यासाठी पाठपुरावा, जमीन अधिग्रहण प्रक्रिया चालू असल्याचेही खा.रणजितसिंह नाईकनिंबाळकर सांगितले. याप्रसंगी भाजपाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कृष्णा हॉस्पिटलच्या स्त्रीरोग तज्ञ डॉ.कविता कांबळे यांचा गौरव

करमाळा(सं.प्र.) : येथील कृष्णा हॉस्पिटलच्या स्त्रीरोग तज्ञ डॉ.कविता कांबळे यांचा वर्ल्ड कॉन्स्टिट्युशन अॅन्ड पार्लमेंट असो; च्या वतीने गौरव करण्यात आला आहे. डॉ.कांबळे यांच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत हा गौरव करण्यात आला आहे. वर्ल्ड कॉन्स्टिट्युशन अॅन्ड पार्लमेंट असो; ही आंतरराष्ट्रीय संघटना आहे. डॉ.कांबळे यांना एचपीव्ही लसीकरणाच्या जागृतीसाठी विशेष पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे. १५ वर्षापासून डॉ.कांबळे यांनी वैद्यकिय क्षेत्रात



उल्लेखनीय काम केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन हा गौरव करण्यात आला आहे. सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन हा गौरव करण्यात आला.

कार्यक्रम तुमचा जबाबदारी आमची, तुम्ही फक्त कार्यक्रमाचा आनंद घ्या !
SK's events & management
घरी कार्यक्रम आहे ? नियोजनासाठी कोण नाही ? घाबरू नका ? आम्हाला संपर्क करा....
• लग्न समारंभ • डी.जे. व सांस्कृतिक वाद्य
• डेकोरेशन • उद्घाटन समारंभ
• जेवण व केटरर्स • वास्तुशांती
• स्वागत समारंभ • फोटोशुट
• वाढदिवस • मेकअप
• नामकरण सोहळा • मेहंदी आर्टीस्ट
• डोहाळे कार्यक्रम • भटजी आणि पुजा साहित्य
पत्ता : राशिनपेठ, करमाळा. / संपर्क : सुरज (9767803011/9822598682)

# प्रधानमंत्री विश्वकर्मा सन्मान योजनेचा लाभ कारागीरांनी घ्यावा : शाम सिंधी







करमाळा(सं.प्र.) : प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना ही १८ प्रकारच्या कारागीरांसाठी असून या योजनेचा लाभ घ्यावा; असे आवाहन भाजपा सोलापूर पश्चिम ग्रामीण जिल्हा सचिव शाम सिंधी यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेसाठी लाभार्थीची नोंदणी बायोमॅट्रिक प्रमाणिकृत आधार आधारीत प्रधानमंत्री विश्वकर्मा पोर्टलद्वारे सामान्य सेवा केंद्राद्वारे केली जाईल. अर्ज नोंदणीसाठी संबंधितांचे आधारकार्ड, ओळखपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, मोबाईल क्रमांक, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, बँक खाते पासबुकाची छायांकित प्रत ही कागदपत्रे आवश्यक आहेत. या योजने अंतर्गत करावयाच्या नोंदणीसाठी जिल्हा अंमलबजावणी समिती लाभार्थीची यादी तपासून शिफारस करेल आणि कौशल्य पडताळणी व कौशल्य प्रशिक्षणासाठी लाभार्थींना एकत्रित करण्यासाठी मदत करेल. या योजनेचा लाभ ग्रामीण भागातील कारागीरांना व्हावा; या हेतूने घरोघरी जाऊन पत्रके देण्यात येत आहेत. एकूणच गरीब, गरजू पारंपारिक कारागीर व हस्तकलेला सर्वांगीण आधार देणारी ही योजना आहे. या योजनेचा लाभ ग्रामीण भागातील कारागीर यांनी घ्यावा; असे आवाहन जिल्हा सचिव शाम सिंधी व संजय गांधी निराधार योजनेचे माजी सदस्य नरेंद्रसिंह ठाकूर यांनी केले आहे.

महिला कामगार/सेल्समन पाहिजेत
श्रीदेवीचामाळ रोड लगत असलेले चिवटे बंधूचे **मुक्ताई गारमेंट, करमाळा** येथे पाच महिला कामगार व सेल्समन पाहिजेत. गरजूंनी संपर्क साधावा !
संपर्क : संजय जगताप (8421409050)

गोडाऊन विकणे आहे
फर्निचर मॉल, कारखाना, किराणा गोडाऊनसाठी उपयुक्त असलेले करमाळा एम.आय.डी.सी. मधील ६००० स्के.फुट (बांधकाम सह) गोडाऊन विकणे आहे.
गोडाऊन मध्ये रेस्ट हाऊस, चार संडास बाथरूम, ऑफिस, २४ तास लाईट/पाणी
संपर्क : बापू डास (9049799579)

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
Ambuja Cement
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.



विजयादशमीच्या तमाम नागरीकांना हार्दिक शुभेच्छा !
गुरूदत्त ज्वेलर्स
॥ सस्नेह निमंत्रण ॥
विजयादशमीच्या मुहूर्तावर सुरू करत असलेल्या
गुरूदत्त ज्वेलर्स या दुकानाचा
॥ भव्य उद्‌घाटन समारंभ ॥
मंगळवार दि.२४/१०/२०२३ रोजी सायं.४.०० वा.
मा.श्री.संजयमामा शिंदे (आमदार, करमाळा)
मा.श्री.जयवंतराव जगताप (माजी आमदार)
मा.श्री.किरण(तात्या) सावंत (का.संचालक, भैरवनाथ शुगर विहाळ)
यांचे शुभहस्ते संपन्न होणार आहे
तरी याप्रसंगी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे !
• आपले नम्र •
श्री.भरत विठ्ठल आवताडे व
आवताडे परिवार
• आमचेकडे सोने-चांदीचे तयार दागिणे तसेच तयार करून मिळतील. •
पत्ता: सुभाष चौक, मेनरोड, करमाळा. (प्रोप्रा : भरत विठ्ठल आवताडे - 7972420101, आकाश भरत आवताडे -9075747612)




दसरा-दिवाळी ऑफर... ऑफर... धमाका ऑफर
ऑफर मर्यादित...
शांती मोबाईल शॉपी
१४,९९९ रु.पुढील
मोबाईल खरेदीवर मोबाईल फ्री...
प्रत्येक १०,००० रु.पुढील मोबाईल
खरेदीवर मिळवा आकर्षक भेटवस्तू...
ब्लुटूथ हेडफोन/पॉवर बँक/इस्त्री/मिक्सर/इंडक्शन/
१.५ लीटर केटल/साऊंड बार/ब्लुटूथ स्पिकर/
आवडत्या स्मार्टफोन खरेदीवर २ वर्षा पर्यंत वॉरंटी.
आपला जुना फोन द्या नवीन फोन घेऊन जा...
स्मार्ट टिव्ही/फ्रीज/ वॉशिंग मशीन खरेदीवर
आकर्षक डिस्काउंट व फायनान्स करून मिळेल.
शांती मोबाईल शॉपी
सॅमसंग
SAMSUNG
बजाज फायनान्स मोबाईल खरेदीवर
झिरो डाऊनपेमेंट ची सोय.
जर आपले Cibil Score कमी असेल
तरी फायनान्स करून मिळेल.
BAJAJ FINSERV
TVS CREDIT
SAMSUNG Finance+
मारवाड गल्ली, करमाळा
9960077323 / 8087555717 / 9960803453




आपल्या सेवेसाठी नव्याने सुरू..
कमलाई स्वीटस्
आमचेकडे राजस्थानी व गुजराती व बंगाली मिठाई मिळेल !
पेढा काजुकतली बर्फी कलाकंद
चकली चिवडा, लाडू जामून जिलेबी
बेकरी उत्पादन
पाणीपुरी वडापाव पॅटीस
कोल्ड्रींक्स सर्व प्रकारचे थंड पेय
ड्रायफ्रुटस् बदाम व काजू तसेच म्हैसुरपाक
प्रोप्रा : देवासी बंधू
मो.8888980006
मो.9423141870
पार्टीसाठी समोसा, ढोकळा,
जिलेबी, पॅटीस,वडापाव, पाणीपुरी
ऑर्डरप्रमाणे तयार करून मिळेल..!
पत्ता कमलाई स्वीटस् एस.टी.स्टॅन्ड समोर, करमाळा.

# मेहेर
## आय & डेन्टल हॉस्पीटल

### उपलब्ध सुविधा

**OPHTHALMOLOGY DEPARTMENT**


- अद्ययावत कन्सल्टींग रूम
- अद्ययावत ऑपरेशन थिएटर
- कॉम्प्युटरद्वारा नेत्र तपासणी
- तिरळेपणा शस्त्रक्रिया
- नेत्रपटलाचे लेझर
- आधुनिक बिनटाक्याची मोतीबिंदू शस्त्रक्रिया (फेको)/फोल्डेबल लेन्स(घडीचे भिंग)
- काचबिंदू उपचार व शस्त्रक्रिया
- कॉन्टॅक्ट लेन्स क्लिनिक





**DENTAL DEPARTMENT**

- मशीनद्वारे दातांची स्वच्छता करणे
- रूट कॅनाल ट्रिटमेंट
- दातांमध्ये सिमेंट, चांदी भरणे
- फिक्स दात बसवणे
- अंशत:/पूर्णत: कवळी बसविणे
- दातांचा एक्स-रे
- हिरड्या, अक्कलदाढेची शस्त्रक्रिया
- वेडेवाकडे दात सरळ करणे
- बालदंत समस्या व उपचार
- डेंटल इम्प्लांट
- स्माईल डिझाईन


## भव्य शुभारंभ सोहळा

**रविवार दि.२२/१०/२०२३**
**सकाळी ११.०० वा.**



### शुभहस्ते

**पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने**
मा.संचालक, वैद्यकिय शिक्षण आणि संशोधन संचालनालय मुंबई
संस्थापक/संचालक, रघुनाथ नेत्रालय

### विशेष अतिथी

**मा.श्री.संजय(मामा) शिंदे**
आमदार, करमाळा.

**मा.श्री.जयवंतराव(भाऊ) जगताप**
माजी आमदार, करमाळा

**मा.श्री.दिग्विजय(प्रिन्स) बागल**
माजी चेअरमन, मकाई स.सा.का.

**मा.श्री.नारायण(आबा) पाटील**
माजी आमदार, करमाळा.

**सौ.रश्मी(दिदी) बागल-कोलते**
सदस्या, म.राज्य साखर संघ

**मा.डॉ.पै.तानाजी(भाऊ) जाधव**
अध्यक्ष, टायगर ग्रुप म.राज्य

**मा.डॉ.रागिनी पारेख** सुप्रसिध्द नेत्ररोग तज्ञ
**मा.डॉ.योगेश राजगुरू** नेत्ररोग तज्ञ, कराड
**मा.डॉ.संतोष नवले** D.H.O.सोलापूर
**मा.डॉ.सुभाष सुराणा** अध्यक्ष, आयएमए करमाळा
**मा.डॉ.अक्षय पुंडे** अध्यक्ष, केटीएमपी
**मा.डॉ.यशवंत व्हरे** अध्यक्ष केएमजी

### प्रमुख उपस्थिती

**मा.श्री.विलासराव घुमरे सर**
सचिव, विद्या विकास मंडळ

**मा.श्री.संतोष पाटील**
मा.चेअरमन, आदिनाथ स.सा.कारखाना

**मा.श्री.श्रेणिकशेठ खाटेर**
सामाजिक कार्यकर्ते, करमाळा.

**मा.ॲड.राहुल सावंत**
माजी सदस्य, पंचायत समिती

**मा.श्री.महेश चिवटे**
जिल्हाप्रमुख, शिवसेना(शिंदे गट)

**मा.श्री.दशरथ कांबळे**
मा.संचालक, आदिनाथ स.सा.का.

**मा.श्री.गणेश करे-पाटील**
अध्यक्ष, यशकल्याणी संस्था

**मा.श्री.संतोष व्होरा**
मा.संचालक, कृषी उ.बा.समिती

**मा.श्री.सुधाकर लावंड**
ता.अध्यक्ष, शिवसेना (ठाकरे गट)

**मा.श्री.अल्ताफशेठ तांबोळी**
माजी नगरसेवक, क.न.प.

**मा.श्री.धुळाभाऊ कोकरे**
मा.संचालक, आदिनाथ स.सा.कारखाना

**मा.श्री.कन्हैयालाल देवी**
चेअरमन, करमाळा अर्बन बँक

**मा.श्री.गणेश चिवटे**
जिल्हा सरचिटणीस, भाजपा

**मा.श्री.संतोष वारे**
मा.संचालक, कृषी उ.बा.समिती

**मा.श्री.महादेव(आण्णा) फंड**
जनतेचे नगरसेवक

तरी या शुभारंभ सोहळ्याप्रसंगी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे !

### आपले विनित

**डॉ.हितेश बाळासाहेब मेहेर**
(M.B.B.S.MS. Ophthalnology)

**डॉ.नेहा हितेश मेहेर(देवकर)**
Dental Surgeon (B.D.S)

**डॉ.सौ.पुनम शैलेश मेहेर(गोरे)**
Dental Surgeon (B.D.S)

**• स्थळ : शाहुनगर, छोटु सिनेमागृह जवळ, करमाळा, जि.सोलापूर •**


शुध्द...स्वच्छ...स्वादिष्ट...नी रुचकर...
हॉटेल चिवटे फॅमिली रेस्टॉरंट
प्युअर व्हेज
महाराष्ट्रीयन, चायनीज, पंजाबी, स्नॅक्स, तंदुरी
संगोबा रोड, श्री देवीचामाळ, करमाळा Mo. 8888147005 / 9822502700
विजयादशमी व दसरा निमित्त
आमच्या सर्व ग्राहकांना व हितचिंतकांना
हार्दिक शुभेच्छा !
प्युअर व्हेज
चिवटे उपहारगृह
येथे साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.
राशिन पेठ, करमाळा, जि.सोलापूर - मो.९००६९४३००६



# अस्थमा(दमा) शिबीर

सर्दी, खोकला, दमा, श्वासाचे वारंवार होणाऱ्या विकारासाठी

वर्षे ९ वे

## औषध प्राशन शिबीर

नांव नोंदणी सुरू

कोजागिरी पौर्णिमा या दिवशी हे औषध संपुर्णत: आयुर्वेदिक असून, हे औषध फक्त कोजागिरी पौर्णिमेला बनवून दुधाबरोबर घ्यावे लागते.

औषधाचा खर्च Rs.400/- (प्रत्येकी)

रविवार दि.२८/१०/२०२२ सकाळी ८ ते संध्याकाळी १०

डॉ.सुमोद दोशी M.D.(Ayu) 9421040328

हे औषध फक्त वर्षातून एकदा कोजागिरी पौर्णिमेला दिले जाते.

माधवबाग™ मल्टीडिसिप्लीनरी कार्डियाक केअर क्लिनीक्स ॲन्ड हॉस्पिटल्स

क्लिनीक

रक्त तपासणी

599/- (5000)




रक्त तपासणी साठी अगोदर १२ तास उपाशी असणे आवश्यक आहे.

रक्त तपासणी अंतर्गत :

हिमोग्लोबिन (Hb)
HbA1c
लिपीड प्रोफाईल– Total Cholesterol,Triglycerides, LDL,HDL,VLDL,LDL/HDL Ratio
Kidney function Test-Sr.creatinine,BUN (Blood Urea Nitrogen)
Liver Function Test- Aspartate Aminotransferase (SGOT)
Alanine Aminotransferase (SGPT)
Thyroid Stimulating Hormone (TSH)
Sr.Calcium





पत्ता : सन्मति मेडिकल,भवानी पेठ,बँक ऑफ इंडिया एटीएम शेजारी, करमाळा,जि.सोलापूर मो.9403294429

## आमचे सर्व ग्राहक, हितचिंतक व मित्र परिवारांना विजयादशमीच्या हार्दिक शुभेच्छा !

करमाळा शहरातील एकमेव लॅमिनेट आणि हार्डवेअर चे भव्य शोरुम

# देवी

प्लायवुड & हार्डवेअर

प्रोप्रा.अभिनव कमलेश देवी Mo. 9011524252



प्लायवुड
हार्डवेअर
सनमायका
किचन ट्रॉली
फेव्हिकॉल
वॉल पेपर
वुडन फ्लोरिंग











# विघ्नहर्ता इंटिरीयर

प्रोप्रा.अभिषेक कमलेश देवी Mo. 9028075051

मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा, जि.सोलापूर

## भांडण सोडविण्यास गेलेल्या प्रौढास दगडाने मारहाण

करमाळा(सं.प्र.) : भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या तरूणास भांडणातील व्यक्तीने दगडाने मारहाण करून जखमी केले आहे. हा प्रकार वडशिवणे येथे १७ ऑक्टोबरला सकाळी आठच्या सुमारास घडला आहे. या प्रकरणी ज्योतिराम बबन काळे (रा.वडशिवणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की वडशिवणे येथे माझे हरिओम शॉपी असे सीसीटीव्ही बसविण्याचे दुकान आहे. सकाळी आठच्या सुमारास मी दुकान उघडल्यानंतर दुकानच्या शेजारी श्रीमंत कवडे यांच्या पंक्चरच्या दुकानातून भांडणाचा आवाज आला. त्यामुळे काय चाललेय हे पाहण्यासाठी गेलो असता, तेथे सोमनाथ काकडे हा चंद्रकांत गोडसे यांना शिव्या देत होता. त्यावेळी मी त्याला गोडसे हे महाराज आहेत, किर्तनकार आहेत त्यांना का शिवीगाळ करतो असे म्हणालो असता सोमनाथ काकडे यांनी मलाच शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण करून तेथे पडलेला दगड उचलून माझ्या डोक्यास, हातास व पायास मारहाण केली. पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## सावडी येथून मोटारसायकलची चोरी

करमाळा (सं.प्र.) : सावडी येथे लावलेल्या मोटारसायकलची चोरी झाली आहे. या प्रकरणी नामदेव भुताजी पारे (रा.सावडी, ह.रा.तांदळवाडी , ता.बारामती) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझ्या मालकीची हिरोहोंडा मोटारसायकल क्र.एमएच ४२ एफ ६९४२ ही सावडी येथील पंकज शिंदे यांच्या घरासमोर लावली होती. ७ ऑक्टोबरला दुपारी तीनच्या दरम्यान ही मोटारसायकल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहे. यात पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## जमिनीच्या कारणावरून जातीवाचक शिवीगाळ करून बेदम मारहाण

करमाळा (सं.प्र.): जमिनीच्या कारणावरून जातीवाचक शिवीगाळ करून चौघांनी एकास बेदम मारहाण केली आहे. हा प्रकार १७ ऑक्टोबरला सकाळी नऊ वाजता वडशिवणे येथे घडला आहे. या प्रकरणी सोमनाथ वामन काकडे (रा.वडशिवणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १६ ऑक्टोबरला सायंकाळी सहा वाजता आमच्या शेतात चंद्रकांत गोडसे हा जनावरे चारताना पाहिला व त्यास तु पिकाचे नुकसान का करतो असे म्हणाले असता त्याने मला जातीवाचक शिवीगाळ केली व उद्या तुझ्याकडे पाहतो.. असे म्हणाला. त्यानंतर १७ ऑक्टोबरला सकाळी नऊ वाजता मी एसटी स्टॅन्डवर वर्तमान पत्र वाचण्यास गेलो असता, तेथे चंद्रकांत गोडसे, कृष्णाजी मोरे, लक्ष्मण मोरे व ज्योतीराम काळे (सर्व रा.वडशिवणे) आले व भांडण मिटवू म्हणून श्रीमंत कवडे यांच्या पंक्चर दुकानासमोर नेले. त्यावेळी त्यांनी पंक्चर दुकानातील लोखंडी टॉमी घेऊन माझ्या डाव्या पायावर मारली व शिवीगाळ करून दमदाटी केली. जातीवाचक शब्द वापरून तुमची जमीन घेतल्याशिवाय तुझी सुट्टी नाही असे म्हणून पुन्हा काठीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपअधिक्षक अजित पाटील हे करत आहेत.

## विवाहितेच्या छळ प्रकरणी चौघाविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : माहेराहून पैसे का आणत नाही, असे म्हणून माहेरात येऊन विवाहितेस मारहाण करणाऱ्या सासरच्या चौघाजणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात शुभांगी गणेश झाकणे (रा.कुंभारगाव) या विवाहितेने फिर्याद दिली आहे. त्यात तिने म्हटले आहे, की पेडगाव (ता.श्रीगोंदा) येथील गणेश संजय झाकणे याच्याबरोबर माझा ६ मार्च २०१६ ला विवाह झाला. त्यानंतर मला शंभुराजे व श्लोक अशी दोन मुले झालेली आहेत. परंतु सासरचे लोक पैशाच्या कारणावरून मला त्रास देतात. नवरा दारू पिऊन मारहाण करतो. त्याने मला घरातून हाकलून दिले त्यामुळे मी माहेरी राहत होते. असे असताना ८ ऑक्टोबर २०२३ ला दुपारी दोन वाजता माझे पती गणेश झाकणे याने येऊन पैशाची व्यवस्था केली का.. असे म्हणून शिवीगाळ व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आहे. यात सासू विजाबाई झाकणे, सासरे संजय झाकणे, दीर सोमनाथ उर्फ राहुल झाकणे, पती गणेश झाकणे या सर्वांनी २०१६ पासून आत्तापर्यंत माझा छळ केला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## युवकाची विषारी औषध पिवून आत्महत्या - केडगाव येथील घटना

करमाळा(सं.प्र.) : तुझी मेहुनी आमच्या मुलाला का देत नाही, असे म्हणून छळ केल्याने एका युवकाने विष पिवून आत्महत्या केली आहे. हा प्रकार केडगाव येथे ५ ऑक्टोबरला सकाळी ९ वाजता घडला. यात बिंटी राजा काळे (रा. केडगाव) या महिलेने फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले,की आमच्या भावकीतील पंढ्या उर्फ शंकऱ्या पवण्या काळे, सुधाबाई पंढ्या काळे , शिरक्या पंढ्या काळे सर्व रा. केडगाव व चिंतू शाबु पवार रा. पांडे हे सर्वजण माझ्या मुलाला म्हणजे योगेश राजा काळे (वय-२४) यास तुझी मेहुनी केसरी हण्या भोसले ही शिरक्याला का देत नाही म्हणून छळ करत होते. त्यामुळे त्यांनी ५ ऑक्टोबरला विषारी औषध प्रशान केले. त्यावर उपचार चालू असताना तो १५ ऑक्टोबरला त्याचे निधन झाले. या सर्वांच्या छळामुळे माझ्या मुलाने आत्महत्या केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सागर कुंजीर हे करत आहेत.

## सव्वापंधरा वर्षाच्या मुलीस पळविले

करमाळा (सं.प्र.) : सव्वापंधरा वर्षाच्या मुलगी घरात कोणी नसताना ती बेपत्ता झाली आहे. हा प्रकार १५ ऑक्टोबरला दुपारी एक ते चार या वेळेत शेलगाव(वीराचे) येथे घडला आहे. या प्रकरणी मुलीच्या आईने पोलीसात फिर्याद दिली आहे. त्यात तिने म्हटले आहे की.. माझा मुलगा आजारी असल्याने मी त्याला दवाखान्यात घेऊन आले होते. बाकीचे लोक कामाला गेले होते. माझी १५ वर्षे चार महिने वयाची मुलगी घरी एकटीच होती. दवाखान्यातून मी दुपारी चार वाजता घरी गेले असता माझी मुलगी मला दिसली नाही. सर्वत्र चौकशी केली तरी ती आढळून आली नाही. यावरून तिला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळवून नेले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनायक माहुरकर हे करत आहेत.

## अपघातात तरूणाचे निधन

करमाळा(सं.प्र.) : मोटारसायकल व टमटमची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात ३२ वर्षाच्या युवकाचे निधन झाले आहे. हा प्रकार ११ ऑक्टोबरला सायंकाळी सात वाजता कंदर शिवारात घडला आहे. या प्रकरणी अमोल जयसिंग गुटाळ (रा.केम) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ११ ऑक्टोबरला सायंकाळी सातच्या सुमारास माझा भाऊ सागर जयसिंग गुटाळ (वय-३२) हा टेंभूर्णीहून केमकडे येत असताना कंदर शिवारात टेंभूर्णी येथील दिपक कसबे याने त्याच्या मालकीचा टमटम हा वेगात आणून त्याने माझ्या भावाच्या मोटारसायकलला समोरून धडक दिली. त्यात माझा भाऊ गंभीर जखमी झाला व त्याचे निधन झाले. या प्रकरणी पोलीसांनी टमटम चालका विरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक साने हे करत आहेत.

## घरकुलाच्या जागेवरून दोघाकडून एकास बेदम मारहाण

करमाळा(सं.प्र.) : घरकुलाची जागा सोड या कारणावरून दोघाजणांनी एकास बेदम मारहाण केली आहे. हा प्रकार १७ ऑक्टोबर ला रात्री ९ वाजता निंभोरे येथे झाला आहे. या प्रकरणी शक्तीमान रमेश भोसले रा. निंभोरे यांनी फिर्याद दिली आहे.

त्यात त्यांनी म्हटले,की १७ ऑक्टोबरला रात्री ९ वाजता मी माझे घरासमोर बसलो होतो. त्यावेळी माझा चुलत भाऊ नाग्य कापुरशेठ भोसले व चुलता कापूरशेठ कोंगऱ्या भोसले आले व तू रहात असलेली जागा आत्ताच्या आत्ता खाली कर नाहीतर मग बघ. त्यावेळी मी म्हणालो,की ही जागा माझे वडीलास घरकुलात मिळाली असताना तुम्ही मला घर खाली करायला का सांगता..? यावर नागेश यांनी खाली पडलेला दगड उचलून मला मारले तसेच मी तेथून बाहेर जावू लागल्यावर तु कोठे चालला असे म्हणून त्यांनी शिवगाळ करून माझी होंडा कंपनीची शाईन मोटारसायकलवरती दगड कारून गाडीचे नुकसान केले.त्याच्यावडीलांने त्याला मदत केली. या प्रकरणी करमाळा पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.




सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू. भरून वर्षेभर घरपोच अंक मिळवा !


विजयादशमी दसरा
निमित्त सर्वांना
मंगलमय शुभेच्छा !
दसरा - दिवाळी ऑफर
२२ कॅरेट सोने दागिन्यांच्या
घडणावळीवर तब्बल
२५% सूट
ऑफर कालावधी
दि.१५ ऑक्टोंबर ते १५ नोव्हेंबर २०२३ पर्यंत
ओंकार गोल्ड पॅलेस
Mo.7798535353 / 8379027471
मेनरोड, भंडारे हॉस्पीटल शेजारी, करमाळा, जि.सोलापूर


न्यू पाटील
मोबाईल एजन्सी
आमचे सर्व ग्राहक, हितचिंतकांना
विजयादशमी
निमित्त मंगलमय शुभेच्छा !
SPECIAL OFFER
दसरा व दिवाळी निमित्त
खास ऑफर
फक्त 14,999/- च्या
पुढील मोबाईल खरेदी करा आणि मिळवा
मोबाईल वर
मोबाईल फ्री
CASH BACK
up to 3500/-
१ वर्ष गॅरंटी
स्मार्ट वॉच
पॉवर बँक
साउंड बार
ब्लूटूथ हेडफोन
एअरबर्ड
BAJAJ FINSERV
TVS CREDIT
DMI FINANCE
0% व्याजदर व
सुलभ हप्ते
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, करमाळा. मो.7020376151 / 9881818059

# प्रामाणिक कामातून अभिषेक आवाड यांनी आपली ओळख निर्माण केली : प्रा.लक्ष्मण राख



करमाळा (सं.प्र.) : अभिषेकच्या रूपाने प्रथमच करमाळा तालुक्याला राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष पद मिळाले असून, अल्पावधीतच अभिषेक आवाड यांनी प्रामाणिक कामातून सोलापूर जिल्ह्यात आपली ओळख निर्माण केली आहे. अशीच वाटचाल त्यांनी पुढे कायम ठेवावी; असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्रा.लक्ष्मण राख यांनी केले.

करमाळा शहरातील सामाजिक कार्यकर्ते अभिषेक अशोक आवाड यांची सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल करमाळा येथील त्यांच्या निवासस्थानी सर्व शिक्षक वर्गाच्या वतीने अभिषेक आवाड यांचा सामाजिक कार्याचा गुणगौरव आणि सत्कार सोहळा आयोजित केला होता. त्याप्रसंगी प्रा.राख बोलत होते. यावेळी राजकुमार खाडे, जयराम सांगळे, शरद जाधव, अशोक मुंडे, उद्योजक जयराम चौधरी यांचेसह पत्रकार बांधव उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रा.राख म्हणाले, की अभिषेक लहानाचा मोठा होताना आम्ही पाहिलेला आहे. ज्या वेळेस म्हणतात की मुलाचे पाय पाळण्यात दिसतात तसे अभिषेकचे पाय आम्हाला खूप मागच्या २०-२५ वर्षापूर्वीच जाणवले होते की हा मुलगा भविष्यात नक्कीच काहीतरी करेल. अभिषेक आवाड यास लहानपणापासूनच समाजकार्याची आवड होती. करमाळा शहरात किल्ला विभाग येथे प्रथमच कधीही न झालेले होम मिनिस्टर सारखे वेगवेगळे कार्यक्रम घेऊन अभिषेकने सामाजिक कार्यात आपला ठसा उमटविला.

प्रा.राख यांनी सरळसेवा भरती, कंत्राटीकरण, खासगीकरण याबाबत समस्या सांगितल्या त्यावेळी अभिषेक आवाड यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्फत शासन दरबारी सर्व विद्यार्थ्यांच्या समस्या सांगून त्या सोडविण्यासाठी मी नक्की प्रयत्न करेल; असा विश्वास व्यक्त केला. त्याचप्रमाणे विद्यार्थी हितालाच प्राधान्य देईल; अशा भावना व्यक्त करत कोणाच्या काहीही वैद्यकिय, शैक्षणिक अथवा इतर क्षेत्रातील समस्या असतील तर त्याही शासन स्तरावरून वरीष्ठांच्या मार्गदर्शनाकाली मार्गी लावूयात. तसेच महिला, युवतींच्या समस्या सोडविण्यासाठीही आपण प्रयत्नशील राहू; असेही अभिषेक आवाड यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले. यावेळी राजकुमार खाडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सर्व शिक्षकांच्या वतीने अभिषेक आवाड यांचा फेटा बांधून, शाल, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच अभिषेकच्या यशामागे खऱ्या अर्थाने आई-वडिलांची मोलाची साथ असल्याने त्यांचा देखील सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

## दसरा व दिवाळी सणासाठी
# हरभरा डाळीचा नागरीकांनी लाभ घ्यावा : शंभुराजे जगताप

करमाळा(सं.प्र.) : पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांच्या माध्यमातून भारत सरकारच्या ग्राहक व्यवहार विभाग आणि नाफेड च्या वतीने खास दसरा व दिवाळी सणानिमित्त नागरीकांसाठी मागेल त्याला ६० रू. किलो या सवलतीच्या दरात भारत डाळच्या नावाने एक आधारकार्डवर पाच किलो हरभरा डाळ विक्री केली जाणार आहे. तरी करमाळा तालुक्यातील नागरीकांनी याचा लाभ घ्यावा; असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व खरेदी-विक्री संघाचे चेअरमन शंभुराजे जगताप यांनी केले आहे.



मार्केट यार्ड करमाळा येथे श्री.जगताप यांचे हस्ते हरभरा डाळ वितरणाचा शुभारंभ करण्यात आला त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी बाजार समितीचे संचालक मनोज पितळे, महादेव कामटे, विकीशेठ मंडलेचा, विलास जाधव, सोनुशेठ वीर, सचिव विठ्ठल क्षीरसागर, पंकज वीर उपस्थित होते.


शिबीर..! शिबीर..! शिबीर..!
Karmala Medico's Guild KMG
श्रीजय नेत्र रुग्णालय (डोळ्यांचा दवाखाना) करमाळा व करमाळा मेडिकोज् गिल्ड यांच्या संयुक्त विद्यमाने
वै.ह.भ.प.मधुकर (आबा) नायकुडे (सालसेकर) यांच्या व्दितीय पुण्यस्मरणार्थ
मोफत डोळे तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया

शिबीर

टिप- शिबीरामधील निवड झालेल्या रुग्णांच्या शस्त्रक्रियेची वेळ व दिनांक शिबीराच्या दिवशी सांगण्यात येईल.
शिबीराची दिनांक - २२/१०/२०२३ वार रविवार
वेळ- सकाळी १०.३० ते सायं.५ वाजे पर्यंत
शिबीराचे स्थळ श्रीजय नेत्र रुग्णालय
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा.
संपर्क मो.9834071218 / 9921013493
डॉ.सौ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे.
नेत्र तज्ञ व शल्य चिकित्सक (आयु.) (Gold Medalist)
श्रीजय ऑप्टिकल
अल्पदरात चष्मे तयार करुन मिळतील.
मोतीबिंदू शस्त्रक्रिया रु.६५००/- पासून पुढे (नियम व अटी लागू)



जाधव-पाटील हॉस्पिटल
करमाळा अर्बन बँक शेजारी, मेनरोड, करमाळा., जि.सोलापूर
● आमचे येथे तज्ञ डॉक्टरांच्या भेटी ●

डॉ.महेश घुगे
D.N.B. Surgeon
प्रत्येक महिन्याचा पहिला रविवार
वेळ : सकाळी ११ च्या पुढे...

डॉ.प्रतिक पाटील
कॅन्सर व रक्त विकार तज्ञ
दर महिन्याचा ४ था मंगळवार
वेळ : सकाळी १०.०० ते १.००

डॉ.दर्शन गौड M.B.B.S. M.S.Mch
मेंदू व मणका शस्त्रक्रिया तज्ञ
प्रत्येक महिन्याचा पहिला शुकवार
वेळ : सकाळी ११ च्या पुढे...

डॉ.राहुल जाधव
पोट विकार तज्ञ
दर महिन्याचा ४ था रविवार
वेळ : सकाळी १०.०० ते १.००

डॉ.प्रमोदकुमार सुर्वे
मणका व सांधे विकार तज्ञ
प्रत्येक महिन्याचा ४ था शुक्रवार

डॉ.संदीप गाडे
(M.D.Med.,D.M.Cardio)
हृदयरोग तज्ञ वेळ : सकाळी ११ च्या पुढे
प्रत्येक महिन्याचा पहिला रविवार

डॉ.अतुल कोकाटे
मानसोपचार व मेंदू विकार तज्ञ
दर दुसरा महिना २ रा रविवार
वेळ : दुपारी ३.०० ते ५.०० पर्यंत

डॉ.आनंद काशिद
मुत्रविकार तज्ञ, लैंगिक विकार तज्ञ आणि किडनी ट्रान्सप्लान्ट सर्जन
दर महिन्याचा पहिला रविवार
वेळ : दुपारी २.०० ते ४.०० पर्यंत

नावनोंदणी संपर्क
फोन : (02182) 299611 मो.9146843871, 7507314133


सर्वांना विजयादशमी दसऱ्याच्या हार्दिक शुभेच्छा !
नवीन वास्तु मध्ये... नव्याने सुरु करित असलेल्या
भव्य दालनाचा शुभारंभ...
घोडके ज्वेलर्स
दसऱ्याच्या शुभमुहुर्तावर...
मंगळवार दि.२४ ऑक्टोंबर २०२३ रोजी
आपल्या सेवेत सुरु करित आहोत..!
आपले नम्र
श्री.विलासराव पुरुषोत्तम घोडके
श्री.सुधांशू विलास घोडके समस्त घोडके परिवार !
GHODAKE JWELLERS
गुजर गल्ली, करमाळा, जि.सोलापूर
Mo.9970665914


दसरा-दिवाळीनिमित्त..
मोबाईल एक्सचेंज ऑफर
मोबाईल खरेदीवर कॅशबॅक मिळवा
कॅशबॅक ऑफर
300 ते 3000
आपट्याची पाने, झेंडुची फुले
घेवूनी आली विजयादशमी
दसऱ्याच्या आज शुभदिनी,
सुख-समृध्दी लाभो तुमच्या जीवनी !
दसरा निमित्त
सर्वांना मंगलमय शुभेच्छा !
मोबाईल घ्यायचाय?
BAJAJ FINSERV
फायनान्स उपलब्ध
Own it on
ZERO DOWN PAYMENT
BUY NOW
oppo SAMSUNG vivo BAJAJ FINSERV TVS CREDIT
श्री संत गजानन महाराज मोबाईल
जय महाराष्ट्र चौक जवळ, मेनरोड, करमाळा. (9420920007)


आमच्या सर्व ग्राहक व हितचिंतकांना विजयादशमीच्या हार्दिक शुभेच्छा !
सोनी ज्वेलर्स
BIS - 916
916 हॉलमार्क सोने-चांदी व राशी खड्यांचे व्यापारी
आकर्षक व सुबक सोने-चांदीचे दागिणे
मिळण्याचे सुवर्णदालन !
• रवि सोनी 9421029869 • अजित सोनी 9423336932
• पत्ता : मेनरोड, करमाळा., जि.सोलापूर •

# सामाजिक उपक्रमाने परिवाराला मिळाले समाधान

माझं माहेर जामखेड. करमाळा येथील व्यापारी शोभाचंदजी, धन्यकुमारजी गरिया हे माझे मामा. त्यांच्या माध्यमातून करमाळा येथील श्रेणिकशेठ खाटेर यांचे स्थळ माझ्या आई-वडीलांना सुचवले. आई करमाळ्याचीच असल्याने तिला सर्व बाबी माहित होत्या. खरंतर लग्नाच्या वेळी माझं वय १८ वर्षाचं होतं. परंतु सर्वांच्याच आग्रहामुळे मला लग्न करावं लागलं. माझं लग्नं १९ डिसेंबर १९९२ साली रजिस्टर पध्दतीने नगर येथे झाले. त्यानंतर करमाळा येथे स्वागत समारंभ करण्यात आला.

मी जामखेड मध्येच शिक्षण घेत होते, त्यावेळी त्यांचा जीप भाड्याने देण्याचा तसेच पत्रे व फर्निचरचा व्यवसाय होता. त्यातून ते प्रगती करत असताना मी खाटेर परिवाराची सुन झाले. लग्न करून घरी आल्यानंतर मला एक-एक बाबी समजू लागल्या. माझे सासू-सासरे खूपच धार्मिक होते. ते कडक उपवास करत होते. त्यांची विचारसरणी जुनी असल्यामुळे मला त्यांच्याकडून जुन्या बाबी समजल्या तसेच जिथल्या तिथे काम करण्याची सवय लागली. माझे सासरे स्वभावाने खूप कडक होते, पण तितकेच मायाळू. सासुबाई (बाई) या अतिशय मायाळू होत्या. मुलीसारखीच त्यांनी मला माया लावली. त्यांच्या डोक्यावर पदर घेण्याच्या पध्दतीने मला आजही डोक्यावर पदर घेण्याची सवय आहे ती कायम टिकून राहील यात शंका नाही.

लग्नानंतर माझे पती व्यवसायामध्ये फार गुंतलेले होते. आम्हाला फारसा वेळ देत नव्हते. त्यामुळे अधुनमधून चीडचीड होत होती, पण परिस्थितीसाठी मी ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. सुरूवातीला आर्थिक स्थिती मध्यम स्वरूपाची होती. अशातच १७ सप्टेंबर १९९४ ला माझ्या मोठा मुलाचा(ॲड.संकेत) जन्म झाला. त्यावेळी सासु-सासऱ्यासह सर्वांना खूपच आनंद झाला. कारण माझे पती हे माझ्या सहा नणंदा नंतर जन्माला आले होते. मुलाला मात्र प्रथमच मुलगा झाल्याने सर्वजण आनंदी होते. पती श्रेणिक खाटेर हे व्यवसायाबरोबरच समाजकार्यासाठी वेळ देत होते. त्याप्रमाणेच शहराची गरज ओळखून एका पाठोपाठ एक असे अनेक नवीन व्यवसाय सुरू करत होते.



## नवरा माझा नवसाचा

त्यानंतर २३ ऑगस्ट १९९९ ला दुसऱ्या मुलाचा (वर्धमान) याचा जन्म झाला. त्यानंतर व्यवसायाबरोबरच सामाजिक कार्यात त्यांनी गती घेतली. प्रथम बुलढाणा येथे दारूचे व्यसन करणाऱ्या लोकांना त्यांची दारू सोडण्यासाठी त्यांना नेवून व्यसनमुक्त केले. त्यानंतर मोतीबिंदू शिबीर, धार्मिक यात्रा, गोशाळा, कोरोना काळात पेशंटसाठी ऑक्सीजन सिलेंडर, जेवणाच्या डब्याची व्यवस्था, गोशाळेस जमीन दान, रूग्णांना तात्पुरत्या स्वरूपात लागणाऱ्या वस्तू उपलब्ध करून देणे, याचबरोबर अनेक मोठ्या स्वरूपाच्या धार्मिक कथेचे आयोजन केले. यामध्ये शर्मा महाराज यांचे भागवत कथा यज्ञ, रामराव ढोक यांची रामकथा, बालयोगी ओतूरकर महाराजांची कथा तसेच शिवकथा असे अनेक कार्यक्रम त्यांनी राबविले. याबरोबरच जिथे-जिथे गरज आहे, तिथे-तिथे त्यांचा मदतीचा हात असतो. या सर्व बाबी समाजाने लक्षात घेतल्या. त्यामुळेच सन २०१६ साली अनेकांनी आग्रह करून मला नगरपालिका निवडणुकीत उभे केले. विशेष म्हणजे माझ्या समोर मोठ्या व्यक्ती असतानाही मतदारांनी भरघोस मतदान करून मला नगरसेविका म्हणून निवडून दिले.

पुढे संकेत शिक्षण घेवून वकील झाला, पण वकिलीपेक्षा वडीलांच्या व्यवसायातच त्याने लक्ष घातले. पुढे मे २०१८ मध्ये त्याचे लग्न राहुरी येथील दिलीपजी चोरडिया यांची कन्या मोक्षा हिच्याबरोबर शिर्डी येथे झाले.

ॲड.संकेत हा जास्त वेळ घरच्या व्यवसायात वेळ देऊ लागला तर सुनबाई घर सांभाळू लागल्याने आम्ही दोघेही सामाजिक कार्यात जास्ती जास्त वेळ देत आहोत. माझे सासू-सासरे असतानाच मला नातू झाला. त्यामुळे त्यांना चौथी पिढी पाहण्याचे भाग्य मिळाले.

समाजकार्याच्या आवडीमुळे व ज्येष्ठ व्यक्तींच्या भेटीगाठी होत असल्याने अनेक नवीन बाबी समजतात. त्यांचे स्वागत करणे हा माझ्या नित्याचा उपक्रम ठरला आहे. याबरोबरच माझ्या सहा नणंद व त्यांचा परिवार मोठा असल्यामुळे पाहुणे मंडळीची सतत ये-जा असते. सध्या आम्ही अतिशय समाधानाने जीवन जगत आहोत. खरंतर सगळे वैभव व सामाजिक कार्य हे तपस्वी सासू-सासऱ्यांचे, गुरूजनांचे, गो मातेचे आशिर्वादानेच आहे असे मी मानते.

लग्न झाले त्यावेळी मी अतिशय शांत स्वभावाची म्हणजे अबोलच होते. परंतु माझ्या पतीने मला अतिशय सन्मानाने माझ्यात परिवर्तन घडविले आहे. ते स्वत:पेक्षा मला जास्त सन्मान देण्याचा प्रयत्न करतात. कोणताही निर्णय घेण्यापूर्वी माझ्याशी नक्की चर्चा करतात. खरंतर पत्नीला याशिवाय दुसरे काहीच लागत नसते. मला न मागता सर्व बाबी मिळाल्या आहेत. सुसंस्कारीत मुलं आणि समर्थपणे साथ देणारा समाज बरोबर असेलतर जीवनात दुसरा कुठलाच आनंद राहत नाही. त्यामुळे मी श्रेणिक खाटेर यांची पत्नी असल्याचा मला निश्चितच अभिमान आहे.

**...सौ.संगीता श्रेणिक खाटेर**(मा.नगरसेविका)
**मो.9132100500**

आमचे सर्व ग्राहक व हितचिंतकांना विजयादशमीच्या हार्दिक शुभेच्छा !
आपल्या मुला-मुलीच्या जीवनातील सर्वात अनमोल क्षण अधिक मंगलमय करण्यासाठी..
सोनेरी क्षणाचे सोबती
महामुनी मंगल कार्यालय
कार्यालयाची वैशिष्ट्ये...
■ सर्व शुभकार्यासाठी हवेशीर व प्रशस्त हॉल
■ वधुवरासाठी वातानुकुलीत/ए.सी. मेकअप रूमची सोय
■ १५०० लोकांची क्षमता/स्वतंत्र डायनिंग हॉल
■ करमाळा शहराच्या दीड कि.मी.अंतरावर
■ प्रशस्त पार्किंगची सोय
■ पाहुण्यांसाठी राहण्याची उत्तम सोय. आठ रूम उपलब्ध
आजचं बुकींग करा
संपर्क मो.9423326587, 8390902342
पत्ता : संगोबा रोड, करमाळा., जि.सोलापूर

७२ बंगल्यामधील चार गुंठे प्लॉट विकणे आहे
संपर्क: मो.९४२३२२३७६८५

गीरगाय विकणे आहे
• संपर्क •
मो.९८२२०५८१०६


सस्नेह निमंत्रण
परस्परोपग्रहो जीवानाम्
केसर
एन्टरप्राईजेस
॥ भव्य वस्त्रदालन ॥
या वस्त्रदालनाचा शुभारंभ
विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर मंगळवार
दिनांक २४ ऑक्टोंबर २०२३ पासुन आपल्या सेवेत येत आहोत.
लेडीज वेअर
साडी
टॉप्स-जिन्स
कुर्तीज्-लेगिन्स
नाईटवेअर
अंडरगारमेंटस्
निमंत्रक
श्रीमती ज्योती अनिलकुमार
(बच्चु) पांढरे व परिवार.
स्थळ : कर्जतरोड,
नागोबा मंदीराजवळ, करमाळा.
जेन्टस् वेअर
फॉर्मल वेअर
कॅज्युअल वेअर
टि शर्ट-जीन्स
नाईटवेअर
इनरवेअर
95 4582 1008 77 7002 1008